-१८-

मोटेल
उभारणी

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्र.एनऐसे.१०६८-१२९८६७-च
सचिवालय,मुंबई ९ एप्रिल १९६९

परिपत्रक

महाराष्ट्र राज्यात निसर्ग सुंदर स्थळे व ऐतिहासिक महत्वाची स्थळे भरपूर असल्यामुळे इतर राज्यातील व आंतरराष्ट्रीय प्रवाशांची रहदारी या राज्यात वाढविण्यास मोठाच वाव आहे.

२. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की बरेचसे प्रवासी स्वत:च्या मोटारीतून किंवा तत्सम स्वयंचलित वाहनातून प्रवास करणे पसंत करतात. या वर्गात ब-याच परकीय प्रवाशांचा समावेश होतो. असे प्रवासी दिवसाकाठी २०० ते २५० मैलाचा पल्ला गाठतात व ते सर्वसाधारणपणे राज्य व राष्ट्रीय महामार्गावरुन प्रवास करतात. शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की अशा महामार्गावर किंवा त्यांच्या परिसरांत अशा प्रवाशांना पल्ल्याबर निवासाची, त्याचप्रमाणे त्यांना प्रसाधन करावयाची, तद्वतच त्यांच्या वाहनांस विश्रांतीच्यावेळी ठेवण्यास योग्य अशा सोयी उपलब्ध नाहीत. म्हणून सर्व महसूल अधिका-यांस या द्वारे खालीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत:

१) महसूल अधिका-यांकडून अशी अपेक्षा आहे की महत्वाच्या स्थळांच्या परिसरांत पेट्रोल पंप बांधण्याकरिता अकृषिक परवानगी देतांना किंवा सध्याच्या पेट्रोल पंपाची वाढ करण्याकरिता अकृषिक परवानगी देताना त्यांच्या मालकांस मोटेल्स् बांधावयाची कळकळीची विनंती करावी. शासनाच्या दृष्टीने मोटेल बांधण्याला योग्य आहेत अशा स्थळांची सूची करण्याचे काम चालू आहे.

२) सर्व पेट्रोल पंपाच्या मालकांस प्रसाधन गृहे (की ज्यांत पाश्चात्य पध्दतीच्या सोयी आहेत) बांधण्याची कळकळीची विनंती करावी.

३) दुरुस्ती केंद्रे (सर्व्हिस स्टेशन्स्) किंवा मोटार घरे(गॅरेजेस्) यांच्या मालकांस त्यामध्ये पाश्चात्य पध्दतीने प्रसाधन गृह बांधावयाची कळकळीची विनंती करावी आणि

४) वरील २ व ३ मधील हेतूकरिता नविन अकृषिक परवानगी देतांना त्यांच्या मालकांस मोटेल बांधावयाची विनंती करण्यात यावी.

OFFICE OF THE COLLECTOR,
RATNAGIRI.
Date '16 APR
Branch RB

३. पेट्रोल पंप, दुरुस्ती केंद्रे किंवा मोटार घरे यांच्या मालकांस महसूल अधिका-यांनी याबाबत योग्य ते मार्गदर्शन करावे. त्याचप्रमाणे त्यांस हे विशद करावे की, अशा व्यवसायात गुंतविलेले भांडवल त्यांना पुढे आर्थिक ऊर्जितावस्थेस नेण्याचा संभव आहे.

४. मोटेल हया संज्ञेचा नक्की काय अर्थ अभिप्रेत आहे हे विशद करणारी टिप्पणी या परिपत्रकासोबत जोडण्यांत आली आहे.

(238)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

क. वा. नेवगी

अवर सचिव, महसूल व वन विभाग.

सोबत:- टिप्पणी.

प्रत रवाना:

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी,

सामान्य प्रशासन विभाग, ग शाखा

ISSUED on 17-5-69

Despatch Clerk

इनारा. ८-४

नं. आरबी/एलएनडी/वन ११८३
रत्नागिरी ... ८-१९६९

२) नक्कल सर्व तहसिलदार व उपविभागीय अधिकारी याजकडे माहितीसाठी व जरूर त्या तजवीजीसाठी रवाना.

२) डिसी ब्रँच माहितीसाठी

3/4

ओ/क जिल्हाधिकारी रत्नागिरी करिता

Pl. Ty. Cly. 3/4

३. पेट्रोल पंप, दुरुस्ती केंद्रे किंवा मोटार घरे यांच्या मालकांस महसूल अधिकाऱ्यांनी याबाबत योग्य ते मार्गदर्शन करावे. त्याचप्रमाणे त्यांस हे विशद करावे की, अशा व्यवसायात गुंतविलेले भांडवल त्यांना पुढे आर्थिक ऊर्जितावस्थेस नेण्याचा संभव आहे.

४. मोटेल ह्या संज्ञेचा नक्की काय अर्थ अभिप्रेत आहे हे विशद करणारी टिप्पणी या परिपत्रकासोबत जोडण्यांत आली आहे.

(238)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

क. वा. नेवगी

अवर सचिव, महसूल व वन विभाग.

सोबत:- टिप्पणी.

प्रत रवाना:

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, ग शाखा

ISSUED on 17-5-69

Despatch Clerk.

इनारा. ८-४

नं. आरबी/अेलअेनडी/वन ११८३
रत्नागिरी ... ८-१९६९

२) नकल सर्व तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी व जरूर त्या तजविजीसाठी रवाना.

~~२) डिग्सी ब्रँच माहितीसाठी~~

३/४

o/c जिल्हाधिकारी रत्नागिरी करिता

Pl. Ty. Cly.
3/4

Copy 90e - 325 - 317

- 29 -

"मोटेल" ची कल्पना ठोबळ स्वरूपात विशद करणारी टिप्पणी.

239

"मोटेल" म्हणजे जवळजवळ एक प्रकारचे हॉटेल, असे समजण्यास हरकत नाही. मोटेल म्हणजे मोटार व हॉटेल या दोन्हीचे एकत्रीकरण आहे. हॉटेलमध्ये माणसाच्या राहण्या - खाण्या - पिण्याची सोय होते. मोटेल मध्ये हे तर असतेच, पण त्याशिवाय मोटारीचीसुध्दा काळजी घेतली जाऊ शकते. पेट्रोल पुरवठा वाहनांची देखभाल, सुटे भाग, छोटी मोठी दुरूस्ती यांची तेथे सोय असते. आपल्या देशात ही कल्पना अजून नवीन आहे. मुख्य उद्देश स्वत:च्या मोटारीतून प्रवास करणा-यांची सोय करण्याचा आहे.मोटेलमध्ये नक्की किती खोल्या असाव्यात, याबाबत निश्चित स्वरूपाचा असा कांही नियम नाही. हे जागेच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील.